MHNG180003532008

| | | |
|---|---|---|
| **दाखल तारीख** | : | **२५.०७.२००८** |
| **नोंदणी तारीख** | : | **२५.०७.२००८** |
| **निकाल तारीख** | : | **२८.०४.२०२६** |
| **कालावधी** | : | **वर्ष महिने दिवस**<br>**१७ ०९ ०४** |

## न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कळमेश्वर यांचे न्यायालय

**(पिठासीन अधिकारी – आर.एल. राठोड)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९४३/२००८** **निशाणी क्र. २८ खाली.**

**(पोलिस स्टेशन कळमेश्वर येथील गुन्हा नोंद क्र. ३८/२००६**

**भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३०४ (अ),४२७ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये)**

**अभियोग पक्ष /फिर्यादी** : महाराष्ट्र शासन तर्फे
पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे कळमेश्वर, जि. नागपूर

**फिर्यादीः शंकरराव रामचंद्रजी तराळे,**
ए.एस. आय. , ब.न. ६८७,
व्यवसायः नोकरी
पोलीस स्टेशन कळमेश्वर,
ता. कळमेश्वर, जि. नागपूर

**तर्फे विद्वान विधीज्ञ** : सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती पल्लवी सोनवणे

**आरोपी** : **राजेश बाबु पांडे**
वयः ५२ वर्षे, व्यवसायः नोकरी
रा. : पी.डब्ल्यु. डी. क्वार्टर नंबर टाईप ३, क्वार्टर नं. २, गिट्टीखदान, तह. जि. नागपूर

**आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ** : श्री के.एन. मोहिले

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २९.०१.२००६ |
| पहिली खबर दिनांक | : | २९.०१.२००६ |
| दोषारोपपत्र दिनांक | : | ०८.०२.२००६ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित दिनांक | : | ०७.१०.२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १५.१२.२०२१ |
| न्यायनिर्णयाकरीता निश्चित केल्याचा दिनांक | : | २४.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | : | २८.०४.२०२६ |
| शिक्षेचा दिनांक, शिक्षा झाली असल्यास | : | निरंक |

**<u>आरोपीचा तपशील</u>**

| अ. क्रं. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | शिक्षेचा तपशील | कलम ४२८ फौ.प्र. संहितेच्या अनुषंगाने संपरीक्षे दरम्यान कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | राजेश बाबु पांडे | २९.०१.२००६ | २४.०२.२००६ | भा.द.सं. २७९, ३०४ (अ), ४२७ तसेच मोटर वाहन अधिनियम १८४ अन्वये | निर्दोष | अंतिम आदेशा प्रमाणे | निरंक |

**<u>अभियोगपक्ष /आरोपी / न्यायालयाचे साक्षीदारांची यादी</u>**

## अ ) अभियोग पक्ष –

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| १. | सुर्यभान उकंडराव गायकवाड | पंच |
| २. | अनिता कवडु गायकवाड | साक्षीदार |
| ३. | सुधीर नामदेवराव राउत | पंच |
| ४. | सुरेश कृष्णराव लंगडे | साक्षीदार |
| ५. | संजय केशवराव गायकवाड | साक्षीदार |
| ६. | संदीप केशवराव घोरसे | साक्षीदार |
| ७. | राजेश भैय्यालाल जैस्वाल | इन्क्वेस्ट पंच |
| ८. | मनिष विनायक निमजे | साक्षीदार |

## ब ) आरोपीतर्फे साक्षीदार, असल्यास –

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| - निरंक - | | |

**क ) न्यायालयातर्फे साक्षीदार, असल्यास –**

| क्रमांक | नाव | पुराव्याचा तपशील |
|---|---|---|
| - निरंक - | | |

**<u>अभियोगपक्ष / आरोपी / न्यायालयाचे निशाणी क्रमांकाची यादी</u>**

**अ ) अभियोग पक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | १३/ सा.क्र. १ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २. | १४ / सा.क्र.२ | जप्ती पंचनाम्यावरील सही |
| ३. | १८ / सा.क्र. ३ | घटनास्थळ पंचनामा |
| ४. | २३/ सा.क्र. ७ | प्रेत पंचनामा |

**ब ) आरोपी / बचाव पक्षाचे साक्षीदार –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| - निरंक - | | |

**क ) न्यायालयाचे साक्षीदार –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| निरंक | | |

**ड ) मुद्देमाल –**

| अ.क्र. | पोलिस ठाणे मालमत्ता नोंदणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| - निरंक - | | |

## <u>न्या य नि र्ण य</u>

**(दिनांक २८ एप्रिल, २०२६)**

१. **<u>थोडक्यात अभियोगपक्षाचे कथन पुढीलप्रमाणे –</u>**

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० चे कलम २७९, ३०४(अ), ४२७ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाचे कलमांखालील दोषारोप पत्रानुसार खटला चालविण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, ए.एस.आय. शंकरराव तराळे ब.न. ६८७ दिनांक २९.०४.२००६ रोजी पोलीस स्टेशन, कळमेश्वर येथे हजर असताना त्यांना स्टेशन डायरी सा.क्र. चौकशी कामी प्राप्त झाल्याने ते घटनास्थळी, गजानन टॉकीज जवळ, कळमेश्वर येथे गेले असता त्यांना एक इसम जखमी अवस्थेत पडलेला दिसला. त्यांनी त्याला उचलून लगेच ग्रामीण रुग्णालय, कळमेश्वर येथे नेले असता डॉ. मेश्राम यांनी त्याला मेयो हॉस्पिटल, नागपूर येथे रेफर केले. त्यानंतर अॅम्ब्युलन्सने त्याला मेयोकडे रवाना केले. मेयो हॉस्पिटलमध्ये सदर जखमीला मृत घाषीत करण्यात आले. सदर अपघाताची चौकशी केली असता संदीप शंकर घोरसे याने सांगितले की, २१.०० वाजता स्प्लेंडर होंडा मोटारसायकल क्र. एम.एच.३१/बी.सी.५१६८ चा चालक त्याची मोटारसायकलने ब्राम्हणी कडून कळमेश्वरकडे जात असताना मागून येणा–या क्वालीस जीप क्र. ५४७० च्या चालकाने त्याची गाडी वेगाने चालवून मोटारसायकलला धडक मारुन अपघात केला. त्यामुळे माटोरसायकल क्र. एम.एच.३१/बी.बी. ५१६८ चा चालक कवडू केशवराव गायकवाड, रा. विदर्भ कॉलनी, कळमेश्वर हे जखमी झाले. त्यामुळे त्यांनी आरोपीविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३. प्रथम खबरीच्या फिर्यादवरुन कळमेश्वर पोलीस स्टेशनला अपराध क्र. ३८/२००६, भारतीय दंड संहितेचे कलम २७९, ३०४(अ), ४२७ तसेच

महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करुन तपास अधिकारी यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, आवश्यक कागदपत्रे हस्तगत केली. तसेच संबंधीत साक्षीदारांचे जबाब नोंदवून सबळ पुरावा मिळून आल्याने दोषारोपपत्र न्यायप्रविष्ट केले.

४. प्रकरणात आरोपीला वॉरंट पाठविण्यात आले. परंतु आरोपी न्यायालयात हजर झाला नाही. त्यामुळे माझे पूर्व पिठासीन दंडाधिका–यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ८२ खाली निशाणी क्र. ११ नुसार घोषणापत्र जाहिर केले. परंतु तरीसुध्दा आरोपी न्यायालयात हजर झाला नाही. त्यामुळे आरोपी फरार असल्याचे सिध्द झाल्याने व त्याची अटकेची शक्यता नसल्याने त्यांनी निशाणी क्र. १ खाली दिनांक २५.११.२०२१ रोजी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २९९ अन्वये साक्षीदार तपासण्याचा आदेश केला. त्यानुसार साक्षीदारांना समन्स पाठविण्यात आले. त्यानंतर ७ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. परंतु त्यानंतर आरोपी न्यायालयात हजर झाल्याने आरोपीविरुध्द नि.क्र. २८ खाली भा.दं.सं. चे कलम २७९, ३०४(अ), ४२७ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम १८४ खाली दोषारोप ठेवले. आरोपीने दोषारोप नाकारल्यामुळे प्रकरण पुढे चालविण्यात आले.

५. अभियोग पक्षाने एकुण आठ साक्षीदार तपासले. सदरील प्रकरणात आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळून आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम–३१३ नुसार बयाण नोंदविण्यात आले. आरोपीने खोटी केस असल्याचा बचाव घेतला.

६. प्रकरणात अभियोगपक्षातर्फे नोंदविण्यात आलेल्या पुराव्याचे व दस्तऐवजांचे अवलोकन करता पुढील मुद्दे या न्यायायालयाच्या समक्ष

न्यायनिर्णयाकरीता उपस्थित झाले. ते मुद्दे व त्याबाबत निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, दि. २९.०१.२००६ रोजी रात्री ९.०० वाजताच्या सुमारास गजानन टॉकीज जवळ, ता. कळमेश्वर, जि. नागपूर येथे आरोपीने त्याची क्वालीस जीप क्रमांक ५४७० ही बेदरकारपणे किंवा हयगयीने व्यक्तीच्या जिवास धोका होईल किंवा दुस–या कोणा व्यक्तीस दुखापत होईल अशा रितीने चालविली ? | : | ..... **नाही.** |
| २. | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वरील क्रमांकाचे वाहन बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर चालवून कवडु केशवराव गायकवाड याची मोटारसायकल क्रमांक एम.एच. ३१/बी.सी. ५१६८ याला धडक दिली त्यामुळे त्याला गंभीर दुखापत झाली व आरोपी आरोपी हे त्याच्या मरणास कारणीभूत झाले ? | : | ..... **नाही** |
| ३. | वरील तारीख, वेळी व ठिकाणी अपघात झाल्यानंतर आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद गाडी हयगयीने व निष्काळजीपणे चालवून अपघात झाल्यामुळे नुकसान घडवून आणले ? | : | ..... **नाही** |
| ४. | वरील तारीख, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील जीप क्र. ५४७० ने मानवी जिवितास किंवा इतरांची व्यक्तिगत सुरक्षितता धोक्यात येईल इतक्या भरधाव वेगाने व रस्त्याच्या परिस्थितीकडे लक्ष न देता चालविले ? | | ..... **नाही** |

५. आदेश काय ? : **<u>अंतिम आदेशाप्रमाणे</u>**

## ।। <u>का र ण मी मां सा</u> ।।

७. अभियोगपक्षाचे विद्वान वकील व बचावपक्षाचे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यांनी त्यांचा युक्तीवाद अभिलेखाप्रमाणे केला.

**<u>मुद्दे क्र.१ ते ४ करिताः–</u>**

(मुद्दे क्रमांक १ ते ४ ऐकमेकांशी निगडीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे निष्कर्ष एकत्रीतपणे नोंदविण्यात येत आहेत. )

८. भा.द.वि.चे कलम २७९ अन्वये गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास आरोपी हा घटनेच्या वेळी त्याच्या ताब्यातील वाहन मानवी जिवीत धोक्यात येईल, अथवा अन्य व्यक्तिला दुखापत होईल वा नुकसान पोहचविण्याचा संभव आहे इतक्या बेदरकारपणे किंवा हयगयीने सार्वजनिक रस्त्यावर वाहन चालवित होता ही बाब सिध्द करणे आवश्यक आहे. तसेच कलम ३०४(अ) अन्वये दोष सिध्दीसाठी आरोपीने मृतक कवडू केशवराव गायकवाड यांना धडक देवून त्यांना गंभीर स्वरुपाची दुखापत झाल्याने तो मृत्यू पावला हे शाबीत करणे आवश्यक आहे. कलम ४२७ अन्वये दोष सिध्दीसाठी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमूद गाडी हयगयीने व निष्काळजीपणे चालवून अपघात झाल्यामुळे नुकसान घडवून आणले, तसेच मोटर वाहन कायद्याच्या कलम १८४ अन्वये दोष सिध्दीसाठी आरोपीने त्याच्या ताब्यातील वर नमुद क्रमांकाची मोटर सायकल मानवी जिवितास किंवा इतरांची व्यक्तीगत सुरक्षा धोक्यात येईल इतक्या भरधाव वेगाने व रस्त्याच्या परिस्थितीकडे लक्ष न देता दुर्लक्ष करुन चालविले हे सिध्द होणे आवश्यक आहे .

९. अभियोगपक्षाचा घटनास्थळ पंच साक्षीदार सुर्यभान उकंडराव गायकवाड (साक्षीदार क्र. १) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक २९.०१.२००६ व ०१.०२.२००६ रोजी पोलिसांनी त्यांना घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकामी बोलाविले नव्हते. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष कुठलीही कारवाई केली नाही. सदर साक्षीदाराला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविला असता त्यावरील सही त्याने मान्य केली परंतु मजकूर नाकारला आहे.

१०. सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने विशेष सहा.सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्ने विचारले असता त्यांनी मान्य केले की, काटोल नागपूर रोडवर रेल्वेस्टेशन रस्त्याकडे जाणा–या रोडवर स्टेशनकडून शिरभाते मंगल कार्यालय चौकात एक तलाव आहे. परंतु त्याने नाकारले की, तलावाच्या काठावर चौकामध्ये पालिसांनी त्यांना घटनास्थळ पंचनाम्याकरिता बोलाविले होते, पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा त्यांना वाचून दाखविला होता व तो बरोबर असल्यामुळे त्यांनी सही केली होती. परंतु त्याने मान्य केले की, दिनांक ०१.०२.२००६ रोजी पोलिसांनी त्याच्यासमक्ष कॉलीस गाडी क्र. एम.एच.३१/बी.बी. ५४७० जप्त केली होती.

११. सदरील साक्षीदार हा घटनास्थळ पंच व जप्ती पंच आहे. अभिलेखावरुन असे दिसून येते की, पोलिसांनी घटनास्थळ पंच हा दिनांक २९.०१.२००६ रोजी केलेला आहे. परंतु सदरील पंच हा त्याच्यासमक्ष दिनांक २९.०१.२००६ रोजी घटनास्थळ पंचनामा केला नसल्याचे कथन करतो. परंतु दिनांक ०१.०२.२००६ रोजीचा जप्ती पंचनामा केल्याचे मान्य करतो. सरतपासात त्याने त्याच्यासमक्ष दिनांक ०१.०२.२००६ रोजी जप्ती पंचनामा केल्याचे नाकारले आहे. सदरील साक्षीदार त्याच्या साक्षीवर ठाम नसून तो त्याची

साक्ष वारंवार बदलत आहे. त्यामुळे त्याची साक्ष विश्वासार्ह वाटत नाही. त्याची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

**१२.** अभियोगपक्षाची साक्षीदार अनिता कवडू गायकवाड (साक्षीदार क्र. २) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, मयत कवडू किशोर गायकवाड हे तिचे पती होते. सदरची घटना दिनांक २९.०१.२००६ रोजी नगरपरिषद शाळा, कळमेश्वर समोर नागपूर काटोल रोडवर घडली होती. तिचे पती १४ मैल दवाखान्यात नोकरी करायचे व कळमेश्वर येथे मोटारसायकलने येणेजाणे करायचे. घटनेदिवशी तिचा भाउ नरेंद्र याने तिला रात्री १०.०० ते १०.३० वाजताच्या दरम्यान फोन करुन सांगितले की, तिच्या पतीचा अपघात झाला आहे व त्याला उपचाराकरिता नागपूर येथील मेयो हॉस्पिटलला नेले आहे. म्हणून ती दवाखान्यात गेली. तिच्या पतीच्या डोक्याला मार लागला होता व ते मरण पावले होते. तिला माहिती पडले की, काटोलकडून नागपूर कडे जाणारी क्वालीस क्र. एम.एच.३१/बी.बी. ५४७० या गाडीने त्यांना धडक दिली होती

**१३.** आरोपीच्या वकिलांनी विचारलेल्या उलटतपासात तिने मान्य केले की, घटना तिने प्रत्यक्ष पाहिलेली नाही त्यामुळे कोणत्या वाहनाने कोणत्या पध्दतीने धडक दिली हे तिला माहिती नाही. त्यावेळी तिला धडक दिलेल्या वाहनाचा क्रमांक माहिती नव्हता. त्यामुळे तिने बयान देताना गाडीचा क्रमांक सांगितला नव्हता. सदरील साक्षीदार ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाही. हिला तिच्या भावाकडून घटनेची माहिती कळालेली आहे. ती घटनास्थळावर पण गेलेली नाही. ती दवाखान्यात गेलेली होती. तिची माहिती ऐकीव असून ती ऐकीव साक्षीदार आहे.

**१४.** अभियोगपक्षाचा साक्षीदार घटनास्थळ पंच सुधीर नामदेवराव राउत (साक्षीदार क्र. ३) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक

२९.०१.२००६ रोजी पोलिसांनी त्याला नागपूर काटोल रोडवर गजानन टॉकिज समोर पंचनाम्यासाठी बोलाविले होते. सदरचा पंचनामा हा १०.३० ते ११.०० वाजेपर्यंत चालला होता. आरोपीच्या वकिलांनी विचारलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, पोलिसांनी त्याला पंचनाम्यासाठी कोणतेही कागदपत्र दिलेले नव्हते. त्याने मान्य केले की, पोलिसांनी त्याला कोणतेही सुचनापत्र दिले नाही, कागदपत्र दिले नाही आणि पंचनाम्यावर त्याची सही घेतली नाही. सदरील साक्षीदार हा त्याच्या सरतपासात त्याच्यासमक्ष पंचनामा झाला होता तर उलटतपासात सुचनापत्र दिले नाही, त्याच्यासमक्ष कार्यवाही नाही, सही घेतली असे कथन करतो. त्यामुळे सदरील साक्षीदारासमक्ष पंचनामा झाला याबाबत शंका निर्माण होते.

**१५.** अभियोगपक्षाचा साक्षीदार सुरेश कृष्णराव लंगडे (साक्षीदार क्र. ४) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, घटना ही दिनांक २९.०१.२००६ रोजी रात्री ९.०० वाजता गजानन टॉकीज जवळ घडली होती. त्यावेळी तो मोटारसायकलने काटोलकडे जात होता तेव्हा जखमी कवडू गायकवाड हे पडले होते. त्याच्या डोक्याला लागलेले होते म्हणून तो व इतर लोकांनी त्याला कळमेश्वर येथील दवाखान्यात नेले. पोलिसांनी त्याला पुढील उपचारासाठी मेयो हॉस्पिटल येथे पाठविले. सदरची घटना कशी घडली हे त्याला माहिती नाही. सदरील साक्षीदाराचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. तो घटना घडल्यानंतर घटनास्थळावर गेला होता.

**१६.** अभियोगपक्षाचा साक्षीदार संजय केशवराव गायकवाड (साक्षीदार क्र. ५) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, मयत कवडू गायकवाड हा त्याचा मोठा भाउ होता. सदरील घटना दिनांक २९.०१.२००६ रोजी रात्री ९.३० ते १०.०० वाजताच्या दरम्यान नगरपरिषद रोडवर घडली. त्यावेळी तो त्याच्या घरी

होता. त्याला पोलीस स्टेशनवरुन फोन आला व अपघाताबाबत माहिती मिळाली. त्यामुळे तो मेयो हॉस्पिटलला गेला. तेथे त्याचा भाउ मरण पावला होता. नंतर त्याला समजले की, अपघात हा क्वालिस गाडी क्र. एम.एच. ३१/बी.व्ही.५४७० याने धडक दिल्यामुळे झाला.

**१७.** आरोपीच्या वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात त्याने मान्य केले की, घटना त्याने प्रत्यक्ष डोळ्याने पाहिलेली नाही. त्यामुळे घटना कशी घडली हे त्याला सांगता येणार नाही. तसेच कोणत्या वाहनाचा अपघात झाला हे त्याला सांगता येणार नाही. त्यामुळे नेमकी कोणाची चूक होती हे त्याला सांगता आलेले नाही.

**१८.** अभियोगपक्षाचा साक्षीदार संदीप शंकरराव घोरसे (साक्षीदार क्र. ६) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, तो मयत कवडू गायकवाड याला ओळखत नाही. सदरची घटना किती वर्षापूर्वी घडली हे त्याला माहिती नाही.

**१९.** सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने विशेष सहा.सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्ने विचारले असता त्याने त्याच्या बयानातील अधोरेखांकीत भाग अ मधील बाबी पोलिसांना सांगितल्या नव्हत्या असे कथन केलेले आहे. सदरील साक्षीदाराचा उलट तपास घेण्यात आलेला नाही. परंतु फिर्यादचे अवलोकन केले असता सदरील साक्षीदार हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहे. त्याच्यासमक्ष घटना घडली होती परंतु सदरील साक्षीदाराने त्याच्यासमक्ष घटना घडल्याचे कथन केलेले नाही व त्याच्या बयानातील मजकूर ज्यामध्ये त्याने त्याच्या समक्ष घटना घडल्याचे कथन केले होते ते त्याने पोलिसांना सांगितल्याचे नाकारले आहे. त्यामुळे सदरील साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयुक्त ठरत नाही.

२०. अभियोगपक्षाचा साक्षीदार राजेंद्र भैय्यालालजी जैस्वाल (साक्षीदार क्र. ७) यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ३०.०१.२००६ रोजी मरणोत्तर पंचनाम्यासाठी बोलाविले होते. मृतकाच्या डोक्याला व गुप्तांगाला मार लागला होता. ते कळमेश्वरला दुचाकीने जात असताना अपघात झाल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला होता. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष पंचनामा केला होता.

२१. आरोपीच्या वकिलांनी विचारलेल्या उलटतपासात त्यांनी मान्य केले की, पोलिसांनी त्याला समन्स दिले नाही. त्याने घटना प्रत्यक्ष डोळयाने पाहिलेली नाही त्यामुळे कोणते वाहन कोणीकडून येत होते व कोणत्या वाहनाने कोणाला धडक मारली हे त्याला माहिती नाही.

२२. अभियोगपक्षाचा साक्षीदार मनिष विनायक निमजे (साक्षीदार क्र. ८ यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्याच्याकडे क्वालीस गाडी क्र. एम.एच.३१/बी.बी५४७० होती. त्याला घटनेचे तारीख वर्ष आठवत नाही. त्याने नाकारले की, त्याच्या वाहनचालकाने मोटारसायकलला धडक दिली होती.

२३. सदरील साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य न केल्याने विशेष सहा.सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्ने विचारले असता त्याने नाकारले की, आरोपी हा त्याच्या गाडीने जात होता व दिनांक २९.०१.२००६ रोजी त्यांच्या गाडीचा क्वालीस गाडीने अपघात झाला व सदर अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला.

२४. सदरील प्रकरणात आलेल्या पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, सदरील प्रकरणात फिर्याद ही ए.एस.आय. शंकराराव तराळे यांनी दिलेली आहे. परंतु, तो मरण पावल्यामुळे त्याला तपासण्यात आले नाही. त्यामुळे फिर्याद व प्रथम खबर अहवाल या बाबी अभियोगपक्षाने शाबीत

केलेल्या नाहीत. तसेच सदरील प्रकरणातील महत्वाचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार संदीप घोरसे याने देखील अभियोगपक्षाच्या कथनास पुष्टी दिलेली नाही. या प्रकरणातील इतर साक्षीदार जवळपास सर्व हे ऐकीव साक्षीदार आहेत. त्यांनी मान्य केले की, घटना त्यांच्यासमक्ष घडली नसल्यामुळे ती कशी घडली व कोणत्या वाहनाने कोणत्या वाहनास धडक दिली हे त्यांना सांगता येणार नाही. सदरील प्रकरणात अभियोगपक्षाने तपासलेले घटनास्थळ पंच हे सुध्दा त्याच्या साक्षीवर ठाम असल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा त्यांच्यासमक्ष झाला या बाबत संशय निर्माण होतो.

**२५.** सदरील प्रकरणात अभियोगपक्षाने वैद्यकीय अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे अभिलेखावर दाखल केलेले वैद्यकीय दस्त व प्रमाणपत्र अभियोगपक्षाने शाबीत केलेले नाही. त्यामुळे मृत कवडू गायकवाड याचा मृत्यू आरोपीने दिलेल्या धडकेमुळे झालेल्या दुखापतीमुळे झाला याबाबत सबळ पुरावा आलेला नाही.

**२६.** अभिलेखावर आलेल्या पुराव्यावरुन अपघात झाल्याचे दिसून येते परंतु ते आरोपीच्या चुकीमुळे, वाहन हयगयीने व निष्काळजीपणे चालविल्यामुळे झाला याबाबत सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे घटनास्थळावर नेमकी काय परिस्थिती होती हे अभिलेखावर आलेले नाही. अपघात कोणाच्या चुकीमुळे झाला हे स्पष्ट झालेले नाही. तसेच एकाही साक्षदाराने आरोपीच्या गाडीचा वेग किती होता हे कथन केलेले नाही. त्यामुळे आरोपी हा त्याच्या ताब्यातील वाहन मानवी जिवित धोक्यात येईल अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीला दुखापत होईल इतक्या बेदरकारपणे किंवा निष्काळजीपणे सार्वजनिक रस्त्यावर चालविले व त्यामुळे जखमीचा अपघात होवून त्यांना दुखापत झाली व तो मृत झाला हे अभियोक्ता पक्ष सबळ पुराव्याने सिध्द करु शकला नाही. त्यामुळे

सदरील प्रकरणात आरोपीविरूद्ध सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या संशयाचा फायदा आरोपीला मिळतो. आरोपीच्या विरुध्द सबळ पुरावा आलेला नाही. म्हणुन मी मुद्दे क्रं. १ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदविलेले आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबत</u>** –

**२७.** सदरील प्रकरणात आरोपीविरूद्ध सबळ पुरावा आलेला नाही. त्यामुळे निर्माण झालेल्या संशयाचा फायदा आरोपीला मिळतो. भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३०४(अ), ४२७ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम १८४ प्रमाणे सिद्ध होण्यासाठी आवश्यक असलेले घटक अभिलेख पटलावर आलेले नाही. त्यामुळे आरोपीची भारतीय दंड संहिताचे कलम– २७९, ३०४(अ), ४२७ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम १८४ मधून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित वाटते. सबब, मुद्दा क्र. ५ च्या अनुषंगाने खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** आरोपीला भारतीय दंड संहिताचे कलम २७९, ३०४(अ), ४२७ तसेच महाराष्ट्र मोटार वाहन अधिनियम कलम १८४ प्रमाणेच्या गुन्ह्यांच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम–२५५(१) प्रमाणे निर्दोष मुक्त करण्यात येते.

**२.** आरोपीचे जमानतीचे बंधपत्र रद्द करण्यात येते.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम-४३७(अ) प्रमाणे स्वतःचे रु.२५,०००/- वैयक्तीक बंधपत्र देवुन पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.04.28 16:47:45 +0530

**(आर.एल.राठोड)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**कळमेश्वर, नागपूर**

**कळमेश्वर**
**दि. २८.०४.२०२६**

**ENDORSEMENT**

| | | |
|---|---|---|
| Case Argued on | : | 10.03.2026 |
| Judgment dictated on | : | 28.04.2026 |
| Transcription Ready on | : | 28.04.2026 |
| Judgment checked and signed off | : | 28.04.2026 |

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हे मुळ न्यायनिर्णय प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर. एम. परमाल (ग्रेड – ३)